# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका अंतर्गत कोराडी बस डेपो येथे ई-बस चार्जीग
**{प्रकल्प विभाग}** स्टेशन उभारणे व अनुंषगीक स्थापत्य कामे करणे या कामास मा. आयुक्त यांनी दि. २८.०६.२०२४ रोजी रु. ३,२६,०१,६८०/- राशीच्या प्राकलनास मंजुरी प्रदान केलेली आहे.

करीता रु. ३,२६,०१,६८०/- राशीला प्रशासकिय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव मा. प्रशासक यांचे मान्यतेस्तव सादर.

टिप :

१. प्रस्तुत कामाकरीता केन्द्र शासनाच्या शहरी वाहतुक विभागाचे pm-e-Bus scheme/२०२४-२५ अंतर्गत केन्द्र शासनाचा निधितुन करण्यात येईल.
२. सदर कामाचे रु. ३,२६,,०१,६८०/- राशीचे प्राकलनास मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त आहे.
३. सदर कामाकरीता मा.मुख्य अभियंता यांची रु. २,६४,२८,०८०/- राशीला दि. २५.६.२०२४ रोजीची तांत्रिक मंजुरी प्राप्त आहे.
४. निस्तृत टिपणी नस्तीत संल्गन आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 886/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 04/07/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका अंतर्गत कोराडी बस डेपो येथे ई-बस चार्जीग स्टेशन उभारणे व अनुंषगीक स्थापत्य कामे करणे या कामास मा. आयुक्त यांनी दि. २८.०६.२०२४ रोजी रु. ३,२६,०१,६८०/- राशीच्या प्राकलनास मंजुरी प्रदान केलेली आहे.

करीता रु. ३,२६,०१,६८०/- राशीला प्रशासकिय मंजुरी प्रदान करणे व निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.